नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:२३/०२/२०२६

पुणे महानगरपालिका
मा. स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.४७

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार, दि.२६/०२/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका (नवीन विस्तारित इमारत) येथे** येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

उप आयुक्त , विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र.१७४१

उप आयुक्त, परिमंडळ क्र.५ कार्यालयाचे नियंत्रणाखालील महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी, भवानी पेठ, कसबा-विश्रामबागवाडा कार्यालयांकडील १४ मुद्यांबाबतची माहे नोव्हेंबर २०२५ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र.उआ-५/७९३३, दि.१३/०२/२०२५ चे पत्र.

विषय क्र.१७४२

उप आयुक्त, परिमंडळ क्र.५ कार्यालयाचे नियंत्रणाखालील महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी, भवानी पेठ, कसबा-विश्रामबागवाडा कार्यालयांकडील १४ मुद्यांबाबतची माहे डिसेंबर २०२५ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र.उआ-५/८०७२, दि.१७/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७४३

उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगड रोड, धनकवडी सहकारनगर व वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्यांबाबतची दि. ०१/०१/२०२६ ते ३०/०१/२०२६ चा एकत्रित अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र.उआप-३/८१९३, दि.१३/०२/२०२६ चे पत्र.

मा. सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र.१७४४

मा. हरिदास चरवड व मा. राजाभाऊ लायगुडे यांचे दि.११/०२/२०२६ चे पत्र.

सन २०२१ मध्ये पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या नव्या गावांमध्ये विद्यमान मालमत्ता कर आकारणी संदर्भात सध्या संभ्रम व प्रशासकीय विसंगतीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. या संदर्भात वेळोवेळी

पुणे महानगरपालिका प्रशासन तसेच महाराष्ट्र शासन यांच्याशी पत्रव्यवहार व चर्चा करण्यात आलेली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत आवश्यक समन्वयाचा अभाव आढळून येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५० अ अन्वये नव्याने समाविष्ट झालेल्या क्षेत्रामध्ये मालमत्ता कर आकारणी टप्प्याटप्प्याने वाढविण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. संबंधित क्षेत्रात प्रत्यक्ष विकासकामे सुरू झाल्यानंतर दरवर्षी कमाल २०% पर्यंत वाढ करण्याची संकल्पना अधिनियमात नमूद आहे. मात्र, समावेशनानंतरच्या कालावधीत संबंधित गावांमध्ये मूलभूत नागरी सुविधांचा अपेक्षित विकास झालेला नाही. पिण्याच्या पाण्याची टंचाई, रस्त्यांची दुरवस्था, जलनिस्सारणाच्या समस्या तसेच इतर नागरी सुविधांचा अभाव मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. परिणामी कर आकारणीबाबत नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे.

या संदर्भात महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत -

दिनांक १५/१०/२०२४ रोजी मालमत्ता कर आकारणीसंदर्भात मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.

दिनांक १९/११/२०२५ रोजी संबंधित बाबींचा पुनरुच्चार करण्यात आला.

तसेच २०२५ मधील पत्राद्वारे पुणे महानगरपालिका आयुक्तांना निर्देश देण्यात आले आहेत की, नव्याने समाविष्ट गावांमध्ये किमान मालमत्ता कर हा संबंधित ग्रामपंचायतीकडून आकारण्यात येणाऱ्या कराच्या दुप्पट दराने आकारण्यात यावा व पुढील वाढ अधिनियमातील तरतुदीनुसार टप्प्याटप्प्याने करण्यात यावी.

तरी, वरील बाबींचा सर्वंकष विचार करून पुणे महानगरपालिका स्थायी समिती ने पुढीलप्रमाणे ठराव करण्यात यावा

१) सन २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या नव्या गावांमधील विद्यमान मालमत्ता कर आकारणीचे तात्काळ पुनरावलोकन करण्यात यावे.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५० अ तसेच नगरविकास विभागाच्या दिनांक१५/१०/२०२४ व १९/११/२०२५ च्या निर्देशानुसार किमान कर हा संबंधित ग्रामपंचायतीकडून आकारण्यात येणाऱ्या कराच्या दुप्पट दरापेक्षा जास्त आकारण्यात येऊ नये.

३) संबंधित गावांमध्ये प्रत्यक्ष विकासकामे सुरू होऊन मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध झाल्यानंतरच दरवर्षी कमाल २०% पर्यंत टप्प्याटप्प्याने कर वाढ लागू करण्यात यावी.

सदर विषयासंबंधी सविस्तर प्रस्ताव तयार करून महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांना मान्यतेकरिता तातडीने पाठविण्यात यावा.

विषय क्र.१७४५

मा. कोमल नवले यांचे दि.११/०२/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेमार्फत नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने अभय योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर अभय योजनेचा लाभ अद्यापपर्यंत अनेक नागरिकांनी घेतलेला असून अद्यापदेखील अनेकांना सदर योजनेचा लाभ मिळालेला नाही. तरी पुणे महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आलेली मिळकतकर सवलत योजना दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद होत असून सदरील योजनेची मुदत दि. १५ मार्च २०२६ पर्यंत करण्यात यावी.

विषय क्र.१७४६

मा. रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम यांचे दि.१२/०२/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिका हद्दीतील निवासी मिळकत धारकांकडून मिळकत कर घेण्यात येतो. ५०० चौ. फुट पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींचा मिळकत कर माफ करण्याबाबत नागरिकांकडून मागणी होत आहे. पुणे महानगरपालिकेची हद्दवाढ पाहता भविष्यात निवासी, बिगर निवासी, मोबाईल टोवर अशा मिळकतीमधून करोडोंचा महसूल मनपास मिळणार आहे. तसेच पुणे शहरात कर आकारणी न केलेल्या हजारो मिळकती असून अशा मिळकतीना कर आकारणी करणे आवश्यक आहे.

५०० चौ. फुट पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या मिळकती या गोरगरीब नागरिकांच्या असतात, सध्याची महागाई व बेरोजगारी लक्षात घेता नागरिकांना दिलासा देण्यासाठी ५०० चौ. फुट पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींचा मिळकत कर माफ करण्यात यावा.

विषय क्र.१७४७

मा. रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम यांचे दि.१२/०२/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिका हद्दीतील निवासी, बिगर निवासी, बखळ मिळकतींना अभय योजना दि. १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत चालू आहे. यामध्ये मिळकत कराच्या दंडावर ७५ % सुट देण्यात येत आहे. परंतु सदर अभय योजनेचा पुरेसा प्रचार व प्रसार झालेला नसल्याने अनेक मिळकती या योजनेपासून वंचित राहिल्या आहेत असे निदर्शनास आलेले आहे. अभय योजनेत मिळकतींच्या करपात्र रकमेतील दुरस्ती अनेक प्रशासकिय कारणांमुळे प्रलंबित आहेत. सबब प्रशासकीय विलंबामुळे देखील अनेक मिळकती अभय योजनेपासून वंचित राहिल्या असून सदर मिळकत धारकांवर अन्याय होत आहे. याबाबत अनेक नागरिकांचे लेखी अर्ज प्रलंबित आहेत.

तरी, मिळकतकराच्या अभय योजनेस १६ फेब्रुवारी २०२६ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत मिळकत कराच्या दंडावर ५०% सुट देण्यात यावी.

विषय क्र.१७४८

मा. हरिदास चरवड , मा. राजेंद्र लायगुडे व मा. सुभाष नाणेकर यांचे दि.१३/०२/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिका हद्दीत शहर व उपनगरांमध्ये लोकसंख्या तसेच वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. नव्याने समाविष्ट भागांमध्ये निवासी व व्यावसायिक विकास वेगाने होत असून त्याचा थेट परिणाम शहरातील प्रमुख चौक व रस्त्यांवरील वाहतूक व्यवस्थेवर होत आहे.

सिंहगड रोड, हडपसर रोड, जुना पुणे मुंबई महामार्ग, नगर रोड, वारजे रोड, वडगाव शेरी रोड, सोलापूर रोड तसेच इतर प्रमुख मार्गांवर सकाळ व संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास येते. परिणामी कामगार, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास सहन करावा लागतो.

महानगरपालिकेमार्फत विकास आराखड्यातील (DP) रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच वाहतूक पोलीस विभागामार्फत नियोजनबद्ध वाहतूक नियंत्रणाचे प्रयत्न सातत्याने होत आहेत. तथापि चौकांमध्ये अस्ताव्यस्त वाहन प्रवेश, सिग्नलचे उल्लंघन, चुकीची पार्किंग, नो-पार्किंग नियमांचे उल्लंघन व वाहतूक शिस्तीचा अभाव यामुळे कोंडीची समस्या गंभीर स्वरूप धारण करीत आहे. अनेक ठिकाणी किरकोळ कारणांमुळे निर्माण झालेली कोंडी सोडविण्यासाठी ४५ मिनिटे ते १ तासाचा कालावधी लागत असल्याचे दिसून येते. यामुळे वेळ, इंधन व आर्थिक नुकसान होते तसेच रुग्णवाहिका, अग्निशमन दल यांसारख्या आपत्कालीन सेवांनाही अडथळा निर्माण होतो.

- 1. या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलीस विभागास पूरक अशी स्वतंत्र सहाय्यक यंत्रणा उभारणे व मा. वाहतूक आयुक्त प्रशासनामार्फत वाहतूक कोंडी होणारे प्रमुख २५० चौक निश्चित करावेत.

2. प्रत्येक चौकात प्रत्येकी दोन ट्राफिक वॉर्डन नियुक्त करावेत.

3. ट्राफिक वॉर्डनची प्रशासकीय जबाबदारी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे सोपवावी.

4. त्यांची कर्तव्ये - वाहतूक नियमनास सहाय्य, सिग्नल पालनाबाबत मार्गदर्शन, चुकीच्या पार्किंग/नो-पार्किंग उल्लंघनांची नोंद व माहिती देणे, जनजागृती व पोलीस विभागाशी समन्वय.

5. वॉर्डनसाठी प्रशिक्षण, गणवेश, ओळखपत्र व आवश्यक साधने उपलब्ध करावीत.

6. योजनेसाठी मा. वाहतूक आयुक्त कार्यालयाशी समन्वयाने मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करावीत

7. वाहतूक नियमभंगावरील दंड महसुलातील महानगरपालिकेचा कायदेशीर हिस्सा नियमित मिळावा यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.
8. प्राप्त महसुलातून वॉर्डन नियुक्ती व खर्च भागवावा.
9. आवश्यक असल्यास स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करावे.
10. पुणे महानगरपालिका हद्दीतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रमुख २५० चौकांमध्ये प्रत्येकी दोन असे ५०० ट्राफिक वॉर्डन नियुक्त करणे, वाहतूक पोलीस विभागाशी समन्वय साधणे व संबंधित खर्चासाठी दंड महसुलातील तरतूद करण्याबाबत कार्यवाही व्हावी

विषय क्र.१७४९
मा. स्वप्नील दुधाने व मा. हर्षवर्धन मानकर यांचे दि.१६/०२/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील निवासी मिळकतीमध्ये सौरउर्जा वापर, ओला व सुका कचरा वेगळा करून गांडुळखत प्रकल्प, पावसाच्या पाण्याची साठवणूक करून ते पुन्हा रिसायकलिंग करून वापरात आणणे (रेन हार्वेस्टिंग) या ०३ प्रकल्पांपैकी एक प्रकल्प राबविला असल्यास ५% व दोन प्रकल्प राबविले असल्यास १०% याप्रमाणे निवासी मिळकतधारकाच्या मिळकतीस चालू करांमध्ये (शासनाच्या कराव्यतिरिक्त) सूट दिली जाते आहे. मा. मुख्य सभा ठराव क्र. ८५ दि. १३/०७/२००७ व मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/७९६ दि. २७/०१/२००९ नुसार सन २००७-०८ पासून या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

आजमीतीस संपूर्ण जगामधील अनेक शहरे प्रदूषणाने ग्रासले गेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने भारतातील प्रमुख शहरांमधील प्रदूषणाची पातळी खूप खालावली आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता पुणे महानगरपालिका सुद्धा प्रयत्नशील असल्याचे काही प्रमुख योजनांमधून दिसून आले आहे. ज्यामध्ये वरील योजनेचा देखील समावेश आहे. याचअनुषंगाने एक महत्त्वाच्या पर्यावरणपूरक योजनेअंतर्गत अजून एक योजनेचा समावेश करावा यासाठी आपण प्रयत्नशील असले पाहिजे.

जगामधील वायु प्रदूषणाकरिता सर्वात महत्त्वाचे दोन प्रमुख स्त्रोत कारणीभूत आहे. ज्यामध्ये कोळसाद्वारे होणारी वीज निर्मिती व इंधनाद्वारे होणारे वायू प्रदूषण, ज्याप्रमाणे इंधानाद्वारे होणारे वायू प्रदूषणबाबतच्या उपाययोजनेसाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, नागरिक जागरूक आहेत त्याप्रमाणे वीजनिर्मितीद्वारे होणा-या प्रदुषणाबाबत थोडेसे दुर्लक्ष होत आहे. परिणामी वायू प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा देखील गंभीर प्रश्न निर्माण होत आहे.

एक जबाबदार जागरूक नागरिक म्हणून पर्यावरणीय समतोल राखणारा म्हणजेच सोलर द्वारे वीज निर्मिती करणारा प्रकल्प आज अनेक इमारती तसेच सोसायटीमध्ये उभारले जात आहे. यामध्ये केवळ सौरउर्जेचा वापर करून गरम पाणी वापरणे इतपतच उद्देश नसून मुख्य वीज वापर बंद करून सौरउर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करून त्याचा वापर केला जात आहे. पुणे महानगरपालिकेतर्फे अशा प्रकल्पांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे जेणेकरून पर्यावरणीय संतुलन राखणेसाठी मोठा हातभार लागेल. या सोलर उर्जा उपक्रमाचे काही महत्त्वाचे फायदे थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत.

सोलर ऊर्जा (सौर ऊर्जा) ही अक्षय, स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेचा मुख्य स्त्रोत असल्याने आज अत्यंत आवश्यक आहे. हे जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करते, वीज बिलात मोठी बचत करते आणि पर्यावरणाचे रक्षण करून कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत करते.

सोलर ऊर्जेची आवश्यकता आणि फायदे:

अक्षय आणि अमर्याद स्त्रोत: सूर्यप्रकाश कधीही न संपणारा (renewable) ऊर्जेचा स्त्रोत आहे. जो कोळसा किंवा तेलासारखा मर्यादित नाही.

पर्यावरण पूरक (Clean Energy): सोलर पॅनेल विजेची निर्मिती करताना कोणत्याही प्रकारचे हानिकारक हरितगृह वायू उत्सर्जित करत नाहीत, ज्यामुळे हवामान बदल रोखण्यास मदत होते.

ऊर्जा स्वातंत्र्य : सोलर सिस्टमच्या माध्यमातून शहरी भागात जास्त प्रमाणात वीज निर्मिती झाल्यास आपण उर्जा निर्मितीच्या बाबतीत स्वावलंबी होऊ शकतो. तसेच यामुळे शहरी भागात होत असलेला वीजपुरवठा दुर्गम भागात / गाव खेड्यामध्ये जेथे वीजपुरवठा अत्यल्प आहे, लोडशेडींग मोठ्या प्रमाणात होते, त्याठिकाणी हस्तांतरित केल्यास तेथील भागासाठी, शेतीसाठी ही बाब खूप उपयोगी होईल.

पर्यावरणाच्या हिताकरिता प्रकल्प म्हणजे सोलर एनर्जी प्रकल्प, म्हणजेच सूर्यप्रकाशाद्वारे वीज निर्मिती करण्याचा प्रकल्प राबवून पर्यावरणाचा शाश्वत विकासाला हातभार लावणाऱ्या व्यक्ती, नागरिक, संस्था, सोसायटी यांना प्रोत्साहन म्हणून त्यांचे मिळकतीच्या करामध्ये अतिरिक्त १०% सवलत देण्यात यावी अशी आग्रही मागणी आहे. तथापि अशा प्रकल्पांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे. याकरिता केवळ आश्वासन नको, कृती आवश्यक आहे आणि याचे पहिले पाऊल पुणे महानगरपालिकेने उचले पाहिजे. यामुळे अधिकाधिक व्यक्ती, नागरिक, संस्था, सोसायटी सोलर एनर्जी प्रकल्प राबविणेसाठी पुढाकार घेतील. याद्वारे कोळशाच्या आधारित वीजेवरील अवलंबित्व कमी होऊन सोलर एनर्जी प्रकल्पाकडे नागरिकांचा कल राहील. जागतिक तापमान वाढीस कारणीभूत असणाऱ्या जीवाश्म इंधनावरील गोष्टीचा वापर कमी होण्यासाठी आपल्या महानगरपालिकेचा हा उपक्रम अभिमानास्पद ठरू शकेल.

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र.१७५०

दिनांक १९/०१/२०२६ ते २५/०१/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ६५ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/१७३१ दि.१०/०२/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र.१७५१

दिनांक २६/०१/२०२६ ते ०१/०२/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ४७ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/१७३२ दि.१०/०२/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र.१७५२

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०१/२०२६ ते दि.३१/०१/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि-१/१७४९, दि.१२/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७५३

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.३, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०१/२०२६ ते दि.३१/०१/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.३/१७६२, दि.१७/०२/२०२६ चे पत्र.

सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

विषय क्र.१७५४

पुणे शहरामध्ये आदर्श शाळा योजनेंतर्गत माधव उर्फ आप्पा कुलकर्णी प्राथमिक विद्यालय या शाळेमध्ये विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे.URBAN SPACE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७२८९६६/- पेक्षा ३३.३३०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४४८६२०१=६३ अधिक जी.एस.टी. र.रु.८०७५१६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६४८५/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.५३०९०/- पर्यंत अशी एकुण र.रु.५३५३२९२=६३ पर्यंत अधिक विशेष भाववाड व सर्वसाधारण भाववाड सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१७१५, दि. ०६/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७५५

नव्याने समाविष्ट झालेल्या परिमंडळ ४ अंतर्गत केशव नगर गावातील स्मशानभूमी येथे दुरुस्ती व सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे.Aadarsh Bharat Enviro Pvt.Ltd. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३३८८८९/- पेक्षा ३०.१५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४४२७७१३=९७ अधिक जी.एस.टी. र.रु.७९६९८९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१२३१५/- पर्यंत अशी एकुण र.रु.५२३७०१७=९७ पर्यंत अधिक विशेष भाववाड व सर्वसाधारण भाववाड सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१७१६, दि. ०६/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७५६

आदर्श शाळा अंतर्गत कोंढवा बु. कै. बापुसाहेब दरेकर मनपा शाळा यथे सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. URBAN SPACE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७७९६०७/- पेक्षा ३३.८७% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४४८३३५४=११ अधिक जी.एस.टी. र.रु.८०७००४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.५२९०३५८=११ पर्यंत अधिक विशेष भाववाड व सर्वसाधारण भाववाड सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१७१७, दि.०६/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७५७

प्रभाग क्र. ६२, कोंढवा बु. येथे शाळा इमारत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. URBAN SPACE यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५०८४७३९/- पेक्षा २९.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६०५०७९=९५ अधिक जी.एस.टी. र.रु.६४८९१४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४२५३९९३=९५ पर्यंत अधिक विशेष भाववाड व सर्वसाधारण भाववाड सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१७१८, दि.०६/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७५८

प्रभाग क्र. ८ मधील तथागत भगवान गौतम बुद्ध विपश्यना विहार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका या ठिकाणी अर्धवट राहिलेली विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. D S Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२२८२३६/- पेक्षा ७.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९३२२५९=४८ अधिक जी.एस.टी. र.रु.७०७८०७/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६४९/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.९२४०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४६४९९५५=४८ पर्यंत अधिक विशेष भाववाड व सर्वसाधारण भाववाड सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१७२०, दि.०६/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७५९

हडपसर येथील रोहन अप्पा काळे दवाखान्याचे ३ रा मजला बांधकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SANTOSH CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८२२२८२७/- पेक्षा ४.५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७८५२७९९=७९ अधिक जी.एस.टी. र.रु.१४१३५०४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.४९०७०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९३१५३७३=७९ पर्यंत अधिक विशेष भाववाड व सर्वसाधारण भाववाड सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१७२१, दि.०६/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७६०

मास्टर प्लॅन नुसार बोपोडी सिवेज डीस्ट्रीक्ट (SD-१०) झोन क्र.२ अंतर्गत ब्रेम्हनचौक ते जगदीशनगर येथे जुन्या जीर्ण/अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्या बदलणे व त्या ठिकाणी नवीन मोठ्या व्यासाच्या मलवाहिन्या विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Aakash construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९७००३०/- पेक्षा ३३.९९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६५८०३१९=५ अधिक जी.एस.टी. र.रु.११८४४५८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.२०८८३०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२५६७५/- पर्यंत अशी एकुण र.रु.७९९९२८२=५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१७३३, दि.११/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७६१

झोन क्र. ३ वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या स.नं. ७७,७८,८२,८३,८४,८५ मधील डी.पी रस्त्यालगत असणाऱ्या नाल्यास RCC सीमाभिंत/कल्व्हर्ट बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHIVANSH INFRA यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१२३०२४३८/- पेक्षा ३२.३६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८३२१३६९=०६ अधिक जी.एस.टी. र.रु.१४९७८४६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.३१४७५८/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१६७७४४/- पर्यंत अशी एकुण र.रु.१०३०१७१७=०६ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१७३४, दि.११/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७६२

झोन क्र.२ मधील क्षेत्रीय कार्यालय हद्दीमधील मलवाहिन्या व पावसाळी वाहिन्या चेम्पियन मशीनद्वारे सफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Kunsh Construction यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७४९९९१६/- पेक्षा ११.२५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६६५६१७५=४५ अधिक जी.एस.टी. र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.६६५६१७५=४५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१७४०, दि.११/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७६३

बकोरीरोड न्याती एलान परिसरात मुख्य मलवाहिनी विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NIRMAL MOTILAL HARIHAR यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८३००५६७/- पेक्षा २८.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५९७६४०८=२४ अधिक जी.एस.टी. र.रु.१०७५७५३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१९१८२९/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.८५९५/- पर्यंत अशी एकुण र.रु.७२५२५८५=२४ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१७४१, दि.११/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७६४

मास्टर प्लॅन नुसार भैरोबा सिवेज डिस्ट्रीक (SD-३) झोन क्र. ४ अंतर्गत जाम्बुलकर मळा परिसर, उदयबाग, सोपानबाग, साळुंखे विहार परिसर, बी.टी. कवडे रस्ता तसेच कोंढवा खुर्द परिसर या ठिकाणी अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहीन्या बदलणे व आवश्यक क्षमतेच्या मोठ्या व्यासाच्या मलवाहिन्या विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s B.N.CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५०५९०५८२/- पेक्षा ३४.९७% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२८९९०५५=४७ अधिक जी.एस.टी. र.रु.५९२१८३०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१६०५५४७/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१९६६६८/- पर्यंत अशी एकुण र.रु.४०६२३१००=४७ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१७४२, दि.११/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७६५

पुणे महानगरपालिकेच्या जावळे भवन येथील मेट्रोपोलिटन सर्व्हेलन्स युनिट येथे एल ई डी स्क्रीन, साऊंड सिस्टीम, सीसीटीव्ही तसेच तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. JD Enterprieses यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५७८७३८९/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा २.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५६७१६४१=२२ अधिक जी.एस.टी. र.रु.१०२०८९५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.० /- पर्यंत अशी एकुण र.रु.६६९२५३६=२२ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करून, काम करुन घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विदयुत/१७४३, दि.११/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७६६

केशवनगर रेणुकामाता मंदिर रोड परिसरात विविध व्यासाच्या जलवाहिनी विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SAIRAJ ENTERPRISES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३२५९८९८/- पेक्षा १८.३०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६६३३३६=६७ अधिक जी.एस.टी. र.रु.४७९४०१/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१४२६७=८८ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१९३७९/- पर्यंत अशी एकुण र.रु.३१७६३८४=६७ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.३७५०००००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१७४४, दि.११/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७६७

प्रभाग क्र.१ (धानोरी – कळस) प्रभाग क्र.३ (सोमनाथनगर – विमाननगर) प्रभाग क्र.४२ (लोहगाव) येथील दैनंदिन पाणीपुरवठा सुरळीत ठेवणेसाठी व्हॉल्व्ह चालू बंद करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. B S K Construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९९७१६८/- पेक्षा ०.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९९९७१६८/- अधिक जी.एस.टी.र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९९९७१६८/- तसेच (११-११-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.९९९७१६८) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१७४५, दि.११/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७६८

प्रभाग क्र. ४२ साडेसतरा नळी भागामध्ये जलनलिका विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. HEMANT DAJIRAM ADAGALE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३१७७३२६/- पेक्षा १९.९९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५४१८९२=५७ अधिक जी.एस.टी. र.रु.४५७५४१/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.२९९९४३३=५७ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.१८७५०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१७४६, दि.११/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७६९

पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारतीचे Structural Audit करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. KBP ENGINEERING SERVICES PRIVATE LIMITED यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६०००००० /- पेक्षा ३७.७६०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७३४४००/- अधिक जीएसटी रु.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३७३४४००/- पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करुन, काम करुन घेणेस मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१७४७, दि.११/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७७०

प्र.क्र. २८ मध्ये आशा पार्क ते न्यू ईरा सोसायटी पर्यंतचा रस्ता नव्याने पथदिवे बसविणे, नव्याने केबल वायर्स टाकणे व विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. D. K. Electricals यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३५३९५८०/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा ५.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३६२६०१/- अधिक जी.एस.टी. र.रु.६०५२६८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.० /- पर्यंत अशी एकुण र.रु.३९६७८६९/- पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करून, काम करुन घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विदयुत/१७४८, दि.१२/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७७१

लेक्सीकॉन नगररोड निओ सिटी-न्याती एलान जे एस पी एम, गुलमोहर प्राईम सोसायटी ते आय व्ही स्टेट सोसायटी, म्हसोबा मंदिर वाघोली येथील मुख्य मलवाहिनी विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ११ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. P H SATAV CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८३००५६७/- पेक्षा ३५.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५३९५३६८=५५ अधिक जी.एस.टी. र.रु.९७११६६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१९१८२९/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.८५९५/- पर्यंत अशी एकुण र.रु.६५६६९५८=५५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करुन घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१७५०, दि.१३/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७७२

कटकेवाडी, विठ्ठलवाडी, जगताप वस्ती वाघोली कद नगर येथे ड्रेनेज लाईन विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. URBAN SPACE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८३००५६७/- पेक्षा ३२.१६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५६३११०४=६५ अधिक जी.एस.टी. र.रु.१०१३५९९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१९१८२९/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.८५९५/- पर्यंत अशी एकुण र.रु.६८४५१२७=६५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करुन घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१७५१, दि.१३/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७७३

नव्याने समविष्ट खडकवासला गावातील खडकवासला पंपिंग स्टेशन ते कोल्हेवाडी फाटा १२ इंची डी.आय. लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. KIRAN DILIP TAGUNDE यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३५५९३२/- पेक्षा ४.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१०१६९४=७२ अधिक जी.एस.टी.र.रु.१०९८३०५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.७१९९९९९=७२ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.३७५००००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१७५३, दि.१६/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७७४

होळकर पंपिंग स्टेशन येथील पंपाचे रेट्रोफिटिंग दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Ranka Engineers यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३६८१२३/- पेक्षा २.०००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३००७६०=५४ अधिक जी.एस.टी.र.रु.५९४१३७/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३८९४८९७=५४ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.२०००००००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१७५४, दि.१६/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७७५

जुने लष्कर जलकेंद्र येथे ११ KV मेन सप्लाय मध्ये सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NEW SOLAR ELECTRICALS AND ELECTRONICS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३७७९८४/- पेक्षा ९.९९०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३०४०५२३=४ अधिक जी.एस.टी.र.रु.५४७२९४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३५८७८१७=४ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.२०००००००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१७५५, दि.१६/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७७६

SNDT झोन अंतर्गत येणाऱ्या कोंढवे-धावडे जॅकवेल पंप क्र.२ च्या पंपाचे रेट्रोफिटिंग, मोटर, स्टार्टर, व्हॉल्व्ह व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Ranka Engineers यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२३६८२७/- पेक्षा १.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१९०२२१=९ अधिक जी.एस.टी.र.रु.७५४२४०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४९४४४६१=९ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.४९९९४५६) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१७५६, दि.१६/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७७७

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र. २ व ३ अंतर्गत स्मशानभूमीमध्ये स्थापत्य विषयक व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. PEDNEKAR KURHADE ASSOCIATES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४६१६४४/- पेक्षा १५.६०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७१४१६२७=५४ अधिक जीएसटी रु.रु.१२८५४९३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.१३९१०/- पर्यंत अशी एकूण र.रु.८४४१०३०=५४ पर्यंत अधिक विशेष भाववाड व सर्वसाधारण भाववाड सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा

करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१७५७, दि.१६/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७७८

पुणे – सोलापूर रस्त्याखालून १००० मिमी व्यासाची जलवाहिनी जॅकिंग व पुशिंग पद्धतीने टाकणे व अस्तित्वातील जलवाहिनीला जोडणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHREE SWAMI GOVINDA CONSTRUCTION 7 यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४५३४४६/- पेक्षा ०% ने) असल्याने त्यांचेकडून र.रु.८४५३४४६/- अधिक जी.एस.टी.र.रु.१५२१६२०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९९७५०६६/- तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.९९७५०६६) पर्यंत तसेच अधिक विशेष भाववाड व सर्वसाधारण भाववाड सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१७५८, दि.१६/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७७९

स्वारगेट ते कात्रज मुख्य रस्त्यावरील दुभाजक दुरुस्ती व पेंटिंग, पेडेस्ट्रीयन क्रॉसिंग, थर्मो पेंट, साईन बोर्ड, कर्ब स्टोन दुरुस्ती, पेंटिंग तसेच देखभाल दुरुस्ती विषयक व तदनु कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. Kashinath Sitaram Kumawat यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५०७७०५४/- पेक्षा ४०.८८% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३००१५५४=३२ अधिक जीएसटी रु.रु.५४०२८०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.८८६५/- पर्यंत अशी एकूण र.रु.३५५०६९९=३२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१७५९, दि.१७/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७८०

कसबा- विश्रामबागवाडा कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी/मलनिःसारण वाहिनी/गैस वाहिनी/वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रीइनस्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे. (भाग २) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. B. N. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७७२३२०/- पेक्षा ४०.१९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४०५०५२४=५९ अधिक जीएसटी र.रु.७२९०९४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.८६४७/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४७८८२६५=५९ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (११-०६-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१७६०, दि.१७/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७८१

मुख्य रस्त्यावरील रस्ते दुभाजक दुरुस्ती व पेंटिंग, पेडेस्ट्रीयन क्रॉसिंग, थर्मोप्लास्टिक पेंट, साईन बोर्ड, कर्ब स्टोन दुरुस्ती, पेंटिंग तसेच देखभाल दुरुस्ती विषयक व तदनुषंगिक कामे करणे (लक्ष्मी रस्ता) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १२ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. B. N. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५०८४०२५/- पेक्षा ४७.९८% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६४४७०९=८१ अधिक जीएसटी रु.रु.४७६०४८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३१२०७५७=८१ पर्यंत ब पाकीट उघडलेचे दिनांक (१०-१०-२०२५) पासून काम करून घेणेस व

त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१७६१, दि.१७/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७८२

पुणे महानगरपालिका वर्धापन दिनानिमित्त छ. संभाजीराजे उद्यान येथे भरविण्यात येणाऱ्या फळे, फुले व भाजीपाला प्रदर्शन करिता हंगामी व शोभिवंत रोपे पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. RAVI NURSERY यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३९५९८५३/- पेक्षा ५.८३% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७२८९९३=५७ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.४०१०१/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३७६९०९४=५७ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (२६-११-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/१७६३, दि.१७/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७८३

उप – आयुक्त क्रमांक ४ अंतर्गत वानवडी रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयामधील विविध उद्यानांत हॉर्टीकल्चर विषयक सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. JAY GANESH DEVELOPERS यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२२१३७५/- पेक्षा ५.२५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९९९७५२=८१ अधिक जीएसटी र.रु.७१९९५६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४७१९७०८=८१ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/१७६४, दि.१७/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७८४

वडगाव बु. स.नं. ५७ या ठिकाणी स्व. मोहनराव भिडे या उद्यानात उर्वरित कामे करणे अंतर्गत हॉर्टीकल्चर विषयक सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. ISHWARI ASSOCIATES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२२९२५०/- पेक्षा ९.९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३८०६७४७=९३ अधिक जीएसटी र.रु.६८५२१५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४४९१९६२=९२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/१७६५, दि.१७/०२/२०२६ चे पत्र.

विषय क्र.१७८५

भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या विविध शाळांमध्ये दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. MADAN ENTERPRISES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५०६६२१४/- पेक्षा १७.८१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१६३९२१=२९ अधिक जी.एस.टी. र.रु.७४९५०६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१०८०९/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१०१४०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४९३४३७६=२९ पर्यंत अधिक विशेष भाववाड व सर्वसाधारण भाववाड सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१७७०, दि.२०/०२/२०२६चे पत्र.

विषय क्र.१७८६

पुणे महानापालीकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांपैकी वडाचीवाडी, पिसोळी व कार्यकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा विभाग क्र. १ यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या येवलेवाडी, कोंढवा व विविध भागात मागणीनुसार

टँकरणे पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. GUJAR WATER SERVICES यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९९९३९६ /- पेक्षा २.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९७८९४०८=६८ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९७८९४०८=६८ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (३१-१०-२०२५)पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.०)पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१७७१, दि.२०/०२/२०२६चे पत्र.

संकीर्ण

विषय क्र.१७८७

पुणे पेठ शिवाजीनगर येथील स.नं. १००/१०१, कुसाळकर पुतळ्यासमोरील व्यावसायिक इमारतीमधील गाळा क्र. १ ही मिळकत ५ वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मालमत्ता/१५२८, दि.२६/१२/२०२५ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.११४, दि.०६/०२/२०२६ विचारासाठी.

१) पुणे पेठ शिवाजीनगर येथील स.नं.१००/१०१, कुसाळकर पुतळ्यासमोरील व्यवसायिक इमारतीमधील गाळा क्र.१ (क्षेत्रफळ १५.८० चौ.मी.) ही मिळकत ५ वर्षे कालावधीसाठी (महाराष्ट्र महानगरपालिका स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नुतनीकरण) नियम, २०२३ मधील नियम क्र.३ (२) अ (iii) (ब) अन्वये भाडेपट्ट्याच्या रकमेत दर तीन वर्षांनी सुधारणा करून वर्तमान वार्षिक भाडेपट्ट्याच्या रकमेत ५ टक्क्यांनी वाढ करून (iii) (अ) नुसार त्या प्रमाणत सुरक्षा अनामत रक्कम देखील वाढ करून) भाडेतत्वावर चालविणेस देणेकरीता सदर गाळ्याचे विद्यमान भाडेकरू श्रीमती. माधवी राजेंद्र कामत यांना मासिक भाडे र.रु.१३,५९१/- (अक्षरी रक्कम रुपये तेरा हजार पाचशे एक्याण्णव) (अधिक वस्तू व सेवा कर) रकमेप्रमाणे दि.१०.०३.२०२५ पासून पुढील ५ वर्ष कालावधीसाठी भाडेपट्ट्याने चालविणेस देणेकरिता मुदतवाढ देणेस, तसेच नियमानुसार शासकीय कर भरून घेणेस व त्यांचेसोबत नोंदणीकृत करारनामा करणेस.

२) श्रीमती. माधवी राजेंद्र कामत यांचेकडून मासिक भाडे र.रु.१३,५९१/- (अक्षरी रक्कम रुपये तेरा हजार पाचशे एक्याण्णव) (अधिक वस्तू व सेवा कर) या रकमेप्रमाणे तीन महिन्यांचे भाडे इतकी अनामत रक्कम र.रु.४०,७७३/- भरून घेणेस.

विषय क्र.१७८८

सन २०२५-२६ मधील अभय योजनेमध्ये यापूर्वी राबविण्यात येणा-या अभय योजनेची मुदत दि. १५ मार्च २०२६ पर्यंत वाढविणेस व सदर योजने अंतर्गत सर्व मिळकतधारकांना (मोबाईल टॉवर वगळून) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ८ मधील नियम ४१ नुसार आकारण्यात आलेल्या २% व्याजाच्या रक्कमेवर ७५% सवलत देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TAX/१७६६, दि.१७/०२/२०२६ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका

(टीप:- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी उपलब्ध आहेत.)